CMYK

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | गुरुवार, दि. २४ ऑगस्ट २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : ३२५ वा किंमत : ५ रुपये | पाने ८

## दहावी-बारावी बोर्डाची परीक्षा आता दोन टप्प्यात

**नवी दिल्ली** : दहावी आणि बारावी बोर्ड परीक्षा आता दोन टप्प्यात होणार आहेत. केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने बुधवारी याबाबतचा निर्णय बुधवारी जाहीर केला.

आगामी शैक्षणिक वर्षांपासून बोर्ड परीक्षासंदर्भात मोठा बदल होणार आहेत. नवीन शैक्षणिक धोरणानुसार अभ्यासक्रमाची ब्ल्यू प्रिंट तयार करण्यात आल्याची माहिती शिक्षण मंत्रालयाने दिली. आता २०२४ च्या शैक्षणिक सत्रासाठी पाठ्यपुस्तके तयार केली जाणार आहेत. त्याशिवाय बोर्ड परीक्षा दोन टप्प्यात होणार आहेत. ज्या विषयांचा अभ्यास पूर्ण झाला, फक्त तेच पेपर देण्याचे स्वातंत्र्यही देण्यात येणार आहे. त्याशिवाय अकरावी आणि बारावीला दोन भाषा अनिवार्य करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये एका भारतीय भाषेचा समावेश असायला हवा, अशी अट घालण्यात आली आहे.बोर्ड परीक्षा आता वर्षातून दोन टप्प्यात होणार आहे. विद्यार्थी दोन्ही वेळा परीक्षा देऊ शकतात, सर्वोत्तम गुण ग्राह्य धरले जातील.

अथवा टप्प्या टप्प्याने अर्ध्या अर्ध्या विषयांची परीक्षा देऊ शकतात. केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या नव्या शैक्षणिक आराखड्यानुसार अकरावी आणि बारावीच्या विद्यार्थांना यापुढे दोन भाषा अनिवार्य करण्यात आल्या आहेत. त्यापैकी एक भाषा भारतीय असायला हवी, अशी अट घालण्यात आली आहे. शिक्षण मंत्रालयाच्या माहितीनुसार, नवीन शैक्षणिक धोरणानुसार अभ्यासक्रमाची ब्ल्यू प्रिंट तयार करण्यात आली आहे.

# चंद्रावर 'तिरंगा' फडकला



## इस्त्रोच्या प्रतिभेचा विजय झाला
## भारताने नवा इतिहास रचला

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

भारताने चंद्रावर सोडलेले चांद्रयान -३ चे चंद्रावर यशस्वी लँडिंग झाले. बुधवारी सायंकाळी ६ वाजून ४ मिनिटांनी चांद्रयानने चंद्राला गवसणी घातली. या यानाच्या रूपाने चंद्रावर तिरंगा फडकला. या यानाने चंद्राला जेव्हा अलिंगन दिले, तेव्हा भारतीय अंतराळ संशाधेन संस्था अर्थात इस्त्रोच्या कार्यालयात आणि देशभर टाळ्यांचा कडकडाट झाला. आनंदाला पारावर उरलेला नव्हता. विज्ञान आणि अवकाश प्रेमींमध्ये आनंदाचे अश्रू तरळले. इस्त्रोने इतिहास घडवला. या चांद्रयानाच्या लँडिंगकडे साऱ्या जगाच्या नजरा लागून होत्या. शेवटचे २० मिनिटे उरली होती. इस्त्रोच्या वैज्ञानिकांनी श्वास रोखून धरला होता. इस्त्रोचे यान चंद्राच्या कुशीत गेले आणि बंगळुरुमधील इस्त्रोच्या मुख्यालयात आणि देशभर एकच जल्लोष झाला. भारताचे चांद्रयान -३चे लँडर चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर उतरले. चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर उतरणारा भारत हा जगातील पहिलाच देश ठरला. याच ऐतिहासिक कामगिरीमागे ज्यांचे हात होते, त्यांनी एकच विजयोत्सव साजरा केला. इस्त्रोतील वातावरण एकदम बदलले. सर्वजण आनंदाने खुश झाले, एकमेकांनी गळाभेट घेतली.

भारतासह जगातील प्रत्येकाच्या नजरा या ऐतिहासिक घटनेकडे लागल्या होत्या. जसजसा लॅण्डिंगचा क्षण जवळ येत होता, तसतशी धाकधूक वाढत गेली. श्वास रोखले गेले. हात जोडले गेले. डोळे मिटले गेले. गूड न्यूज आली. चांद्रयान- ३ ची मोहीम फत्ते झाली. प्रत्येक भारतीयाच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले. आणि मनात आनंदाचे धबधबे फुलून गेले. भारताच्याच नाही तर संपूर्ण जगाच्या इतिहासात, जिथे जगातले कुणीच गेलेले नाही, अशा दक्षिण ध्रुवाच्या उंबरठ्याचे भारताने सीमोल्लंघन केले. त्यामुळे हा क्षण फक्त भारताच्याच नाही तर, अखंड जगाच्या इतिहासात नोंदवला जाणार आहे.

गेल्या तीन चार वर्षांपासून शास्त्रज्ञांनी एकाच ध्यासाने काम केले. त्या कामाचे बुधवारी चीज झाल्याचे आनंदी चित्र इस्त्रोच्या शास्त्रज्ञांच्या चेहऱ्यावर दिसले.

### यशाचा सूर्य चंद्रावर उगवला

भारताच्या इतिहासातली सर्वात मोठी, सर्वात अभिमानाची आणि सर्वात मोठ्या गौरवाची अशी ही गोष्ट. भारतातील १४० कोटी जनतेची मान आज अभिमानाने उंचावली गेली, ऊर आनंदाने भरून आला. आज प्रत्येकजण इस्त्रोच्या शास्त्रज्ञांना कडक सॅल्युट करत एवढेच म्हणतोय, 'गर्व आहे मला, मी भारतीय असल्याचा'. कारण, भारताच्या चांद्रयानाने चंद्राला अलिंगन दिलेय. इस्त्रोचे यान चंद्राच्या कुशीत शिरले. आधीच्या चंद्रमोहिमांच्या अपयशाची जळमटे क्षणार्धात कुठल्या कुठे झटकून टाकली गेलीत. भारताच्या यशाचा सूर्य थेट चंद्रावर उगवला आहे.

चांद्रयान-२ मोहिमेत अपशय आल्यानंतरही भारताने हार मानली नाही. जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर २०२० मध्ये चांद्रयान-३ मोहिमेला इस्त्रोकडून सुरुवात करण्यात आली आणि त्याचे फळ आज मिळाले. आंध्रप्रदेशातील श्रीहरीकोटा येथील सतीश धवन अंतराळ केंद्रातून १४ जुलै रोजी दुपारी २.३५ वाजता यशस्वी उड्डाण केले.

### पाण्याचे साठे शोधणार...

चंद्राचा दक्षिण ध्रुव कायम अंधारात असतो. येथील वातावरण अतिशय थंड असते. भारताच्या चांद्रयान-१ ने चंद्रावर बर्फाचा शोध लावला होता. त्यानंतर आता तेथे पाण्याचे साठे शोधणे हे चांद्रयान-३ चे प्रमुख उद्दीष्ट आहे. चंद्रावरील विविध नमुने गोळा करुन त्यावर इस्त्रोकडून संशोधन करण्यात येणार आहे.

### ७०० कोटींच्या खर्चाचे चीज झाले

चांद्रयान -३ मोहिमेसाठी सुमारे ७०० कोटी रुपयांहून अधिक खर्च आला आहे. महत्त्वाचे म्हणजे भारताच्या चंद्रमोहिमेचा खर्च इतर सर्व देशांच्या तुलनेने फार कमी आहे. कारण, चांद्रयान-३ मधून फक्त लँडर आणि रोव्हर हे अवकाशात पाठवण्यात आले आहे. याआधी प्रक्षेपित करण्यात आलेल्या चांद्रयान-२ च्या ऑर्बिटरचा वापर चांद्रयान-३ मोहिमेत करण्यात येणार असल्याने चांद्रयान-३ मध्ये ऑर्बिटर पाठवण्यात आलेले नाही. चांद्रयान-२ च्या ऑर्बिटरचा चांद्रयान-३ सोबत संपर्क झालेला आहे. त्यामुळे या मोहिमेत आता चांद्रयान-२ चीही मदत होणार आहे. चांद्रयान-२ मोहिमेसाठी ९६० कोटी रुपये खर्च आला होता. तर चांद्रयान-३ मोहिमेसाठी ६१५ कोटी रुपये खर्च आला आहे. चांद्रयान-३ प्रक्षेपणाचा खर्च सुमारे ७५ कोटी असल्याचे सांगण्यात आले.

### अखंड भारतासाठी अभिमानास्पद यश

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी द.आफ्रिकेची राजधानी जोहान्सबर्गमधून या चांद्रयानाचे थेट लँडिंग प्रक्षेपण पाहिले.यानाने चंद्राला गवसणी घातल्यानंतर मोदी अत्यंत भावूक झाले.त्यांचेही डोळे आंनदाने भरून आले.इस्त्रोच्या प्रतिभेची त्यांनी मुक्तकंठाने प्रशंसा केली.भारतीयांना शुभेच्छाही दिल्या.या गौरवपर भाषणात ते म्हणाले की, चंद्रावर उतरुन भारताने इतिहास रचला आहे. हा क्षण अविस्मरणीय आहे. सध्या प्रत्येक भारतीय जल्लोष करत आहे. अखंड भारतासाठी हा अभिमानास्पद क्षण आहे.

### सांगोल्याचा परीसस्पर्श...



चांद्रयान मोहिमेमध्ये सांगोला तालुक्यातील एका उद्योजकाचे मोठे योगदान लाभले.या उद्योजकाने पुरवलेल्या सिल्वर आणि कॉपरपासून तयार केलेल्या ट्यूबचा वापर या चांद्रयानामध्ये करण्यात आला आहे. या ट्यूबमुळे चांद्रयानाचे वजन कमी होण्यास मदत झाली. शिवाय चांद्रयानाला वेळोवेळी देण्यात आलेले सिग्नल देखील व्यवस्थित पोहोचण्यास मदत झाली. अत्यंत गरीब परिस्थिती मधून आलेल्या शेखर भोसले या उद्योजकाचे सर्वत्र कौतुक होत आहे. भोसले यांचे बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव येथे चांदीपासून इलेक्ट्रिक उपकरणे बनवण्याचा व्यवसाय आहे. गेल्या अकरा वर्षांपासून ते इस्त्रोला चांदी आणि कॉपर पासून बनवलेली विविध उपकरणे पुरवतात. चांद्रयान करून त्या इस्त्रोला दिल्या. त्या सर्व ट्युबचा वापर चांद्रयानामध्ये करण्यात आला आहे. भोसले हे मूळचे सांगोला तालुक्यातील खवासपूर गावचे आहेत. त्यांची शेती खवासपूर मध्ये आहे. आजही ते खवासपूरमध्ये शेती करतात त्यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण हे सांगोल्यात झाले आहे. मोहीम यशस्वी झाल्याने सांगोल्याचे आमदार शहाजी बापू पाटील यांनी शेखर भोसले यांच्या या कामगिरीचे कौतुक केले.

## दहावीतील किशोरवयीन तरुणाची झाडाला गळफास घेऊन आत्महत्या

सुराज्य/सोलापूर



घरातून शाळेत जातो असे सांगून बाहेर पडलेल्या दहावी इयत्तेतील एका १६ वर्षीय किशोरवयीन तरुणाने झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना आमराईच्या पाठीमागे घाण पाण्याच्या ओढ्याजवळ आज बुधवारी दुपारी उघडकीस आली.

गणेश लक्ष्मण वाघमारे (वय १६ रा. अवसे वस्ती,आमराई) असे मयताचे नाव आहे. गणेश हा आमराई परिसरातील एका शाळेत इयत्ता दहावीत शिक्षण घेत होता. बुधवारी सकाळी १०.३० वाजता गणेश हा घरातून शाळेत जाण्यासाठी निघाला. अंगात शाळेचा गणवेश आणि खांद्याला शाळेची बँग लावून तो गेला होता. दुपारी १२ वाजेच्या सुमारास आमराईच्या पाठीमागील घाण पाण्याच्या ओढ्याजवळ असलेल्या एका चिंचेच्या झाडाला त्याचा मृतदेह दोरीने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. झाडाच्या खाली गणेशचे दप्तर आढळले.याची माहिती मिळाल्यानंतर सलगर वस्तीच्या पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शासकीय रुग्णालयाकडे उत्तरीय तपासणीसाठी पाठवून दिला.

मयत गणेश हा सोलापुरात काकाकडे राहण्यास होता. त्याचे इतर दोन भाऊ आणि आई वडील हे पुणे येथे राहण्यास असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.या घटनेची नोंद सलगर वस्ती झाली असून या मागचे कारण समजले नाही.पुढील तपास सहाय्यक फौजदार न्यामने करीत आहेत.

## मोहोळजवळच्या अपघातात चार ठार; सहा जखमी

### कारची मालट्रकला धडक

सुराज्य/सोलापूर



ईको कारने मालट्रकला पाठीमागून जोराची धडक दिल्याने झालेल्या अपघातात ४ जण ठार तर ६ जण गंभीर जखमी झाले. हा अपघात बुधवार २३ ऑगस्ट रोजी पहाटे साडेचार वाजता सोलापूर पुणे महामार्गावर मोहोळ तालुक्यातील यावली गावच्या नजीक घडला.

याबाबत मोहोळ पोलीस सूत्रांकडून मिळालेली अधिक माहिती अशी की, बुधवार २३ ऑगस्ट रोजी अहमदनगर जिल्ह्यातील इको कार क्र. एम.एच. ४६/ ए.पी. ४१२० हि सोलापूर पुणे महामार्गावरून सोलापूरच्या दिशेने जात होती. सदरची कार मोहोळ तालुक्यातील यावली गावच्या शिवारात आली असता, भरदा वेगात समोरून आलेल्या अज्ञात वाहनाने त्यांच्या कारला जोराची धडक दिल्याने भीषण अपघात झाला. या अपघातामध्ये कारचालक आदमअली मुनावरअली शेख (वय ३७), हिराबाई रामदास पवार (वय ७५), कमलाबाई मारुती वेताळ (वय ६०) हे जागीच ठार झाले तर द्वारकाबाई नागनाथ गायकवाड (वय ४०) यांचा उपचारादरम्यान सोलापूरच्या सिव्हिल हॉस्पिटल येथे मृत्यू झाला.

या अपघातात बाळी बाबु पवार (वय२७), छकुली भिमा पवार (वय २७), साई योगीराज पवार (वय ७), मंदाबाई नाथा पवार (वय ५२), सुरेखा भारत मोरे (वय ४५), बायजाबाई रामदास पवार (वय ६०) सर्व रा. राजनगाव मशीद, जि. नगर, अशी जखमींची नावे असून त्यांच्यावर सोलापूर येथील सिव्हिल रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या सर्व जखमींना १०८ क्रमांक म्बुलन्स मध्ये डॉक्टर रईस शेख व पायलट दिनेश निंबाळकर यांनी सोलापूरला आणले. याप्रकरणी सावळेश्वर टोळनाक्याचे पेट्रोलींग ऑफिसर मलिकार्जुन बळीराम बजुलगे यांनी मोहोळ पोलिसात दिलेल्या खबरीवरून मोटार अपघाताची नोंद करण्यात आली आहे. या घटनेमुळे अहमदनगर जिल्ह्यातील रांजणगाव मशीद गावावर शोककळा पसरली आहे.

## पावसाची दीर्घकाळ ओढ; पिकांचे नुकसान ठरवा

### सर्वेक्षणासाठी समिती गठीत; जिल्हाधिकाऱ्यांचा आदेश

सुराज्य/सोलापूर

जुलै व ऑगस्ट महिन्यात पावसाने पाठ फिरवल्यामुळे सोलापूर जिल्ह्यात सर्वच ठिकाणी खरीप हंगाम वाया गेला आहे. बीड पॅटर्ननुसार खरीप हंगामात राबवण्यात आलेल्या प्रधानमंत्री पीक विमा योजनेत २१ दिवसांपेक्षा अधिक काळ पावसाचा खंड असल्यास तातडीची नुकसान भरपाई म्हणून विमा नुकसान भरपाईच्या २५ टक्के रक्कम आगाऊ दिली जाते. हा निकष गृहीत धरून नुकसानीबाबतचे सर्वेक्षण तातडीने करावे व पीकनिहाय नुकसान भरपाईची रक्कम निश्चित करावी, असे आदेश प्रभारी जिल्हाधिकारी मनीषा आव्हाळे यांनी काढले आहेत. यासाठी विमा कंपनीचे प्रतिनिधी व राज्य शासनाचे अधिकारी यांची संयुक्त समिती स्थापन करण्यात आली आहे.

जुलैच्या तिसऱ्या आठवड्यानंतर सोलापूरसह राज्यातील बहुतांश जिल्ह्यांमध्ये पावसाने दडी मारली आहे. अवर्षण प्रवण मानल्या गेलेल्या सोलापूर जिल्हयाच्या काही भागात तर पेरण्या देखील झालेल्या नाहीत. जेथे पेरण्या झाल्या तेथे पिके उगवली मात्र, पुरेसा पाऊस नसल्यामुळे ती जळालीही. उडीद, मका, सोयाबीन, तूर या पिकांना यंदाच्या खरीप हंगामात मोठा फटका बसला आहे.

यावर्षीचा खरीप हंगामाचा आढावा घेतला तर जिल्हयाच्या सर्वच भागात जुलैपासून पावसाने ओढ दिली आहे. ऑगस्ट महिन्यात तर कुठेही पाऊस पडला नाही. त्यामुळे पिक विमा योजेअंतर्गत हंगाम कालावधीत पावसातील खंड, दुष्काळ या बाबींमुळे पीक विमा योजनेतंर्गत २५ टक्के मर्यादेपर्यंत शेतकऱ्यांना आगाऊ रक्कम देण्याची तरतूद आहे.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




मामाच्या गावाला कधी जाऊया?

| कल्याण |
|---|
| 135-92-679 |

| मुंबई |
|---|
| 280-05-690 |

## चांद्रयान चंद्रावर; सोलापूरचा आनंद केबीसीच्या हॉटसीटवर

### बहुत उच्च विचार है आपके, म्हणत बिग बी ने केला गौरव



सुराज्य/सोलापूर

चांद्रयान चंद्रावर पोहचल्याचा देशभरात आनंद असताना सोलापूरचा आनंद मात्र केबीसीच्या हॉटसीटवर पोहचल्याने सोलापूरकरांच्या आनंदात आणखी भर पडली आहे. घरच्या आर्थिक प्रश्नांवर मात करून संघर्ष करणाऱ्या आनंदचा प्रवास ऐकून खुद्द बिग बी अमिताभ बच्चन यांनी देखील बहुत उच्च विचार है आपके, म्हणत कौतुक केले आहे.

सोलापुरातील विनायक नगर येथे राहणारा आनंद कुरापाटी कौन बनेगा करोडपती शो मध्ये पोहचला असून वेगवेगळ्या १२ प्रश्नाची उत्तरे देत २५ लाखांच्या १३ व्या प्रश्नापर्यंत पोहचला आहे. हा एपिसोड गुरुवारी रात्री ९ वाजता सोनी टिव्हीवर प्रसारित होणार आहे. कार्यक्रमादरम्यान आनंद कुरापाटी यांच्या आई वडीलांशी अमिताभ बच्चन यांनी संवाद साधला.

### आई-वडिलाच्या सल्ल्याने आयुष्य बदलेल



अलिकडे लहान मुलांपासून मोठ्यांपर्यंत अनेकजण नैराश्यातून आत्महत्या करत असल्याचे दिसून येते. जीवनात संघर्ष सर्वांनाच असतो नैराश्य आल्यास आई-वडिलांचा सल्ला घेऊन कार्य केल्यास आयुष्य बदलू शकते, असे आनंद कुरापाटी याने सुराज्यशी बोलताना सांगितले.

### संघर्षातून समृद्धीकडे...

आनंद कुरापाटीचे एमएससी शिक्षण झाले असून तो पुण्यात स्पर्धा परीक्षेची तयारी करतोय. वडिलांना २०१२ मध्ये पॅरॅलेसीचा अटॅक आल्यानंतर विडी कामगार असलेल्या आईने घर चालवले. शिक्षण घेत असताना आनंदने शाळेचे गणवेश शिवत घर प्रपंचाला मदत केली. पण आपले शिक्षण थांबवले नाही जिद्दीने शिक्षण पूर्ण करून आता अधिकारी होण्यासाठी स्पर्धा परीक्षेची तयारी करत आहे.

## जिल्ह्याच्या राजकारणात नव्या शिंदेंचा होणार श्रीगणेशा

सुराज्य/सोलापूर



सोलापूर जिल्ह्याच्या राजकारणात शिंदेशाहीचा मोठा दबदबा आहे. माजी केंद्रीय गृहमंत्र्यांपासून अनेक आमदारांपर्यंत शिंदे आडनावाच्या व्यक्तींनी राजकारणात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. आता सोलापूर जिल्ह्याच्या राजकारणात आणखी एक शिंदे आडनावाचे युवा नेतृत्व येऊ पाहत आहे. गोकूळ शुगरच्या माध्यमातून शेतकऱ्यांसाठी नंदनवन फुलवणाऱ्या दत्ता शिंदे यांना राजकारणात श्रीगणेशा करायचा आहे. ही एंन्ट्री कशी होणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

सोलापूर जिल्हा हा राजकिय मातब्बर नेत्यांचा जिल्हा आहे. या जिल्ह्याला एकाच वेळी मुख्यमंत्री (सुशीलकुमार शिंदे) आणि उपमुख्यमंत्री (विजयसिंह मोहिते-पाटील) पदाचा मान मिळवला आहे. सोलापूर जिल्ह्याच्या राजकीय पटलात शिंदेशाहीने वेगळा ठसा उमटवला आहे. देशाच्या पटलावर गाजलेले सोलापूरचे सुपुत्र म्हणून सुशीलकुमार शिंदे यांनी अनेक मंत्रिपदे मिळवून राष्ट्रीय राजकारणात आपल्या नावाचा ठसा उमटवला आहे. त्याचबरोबर तीन वेळा आमदारकीची हॅट्ट्रिक करणारी त्यांची कन्या आ.प्रणिती शिंदे यांनी देखील स्वत:ची स्वतंत्र ओळख निर्माण करून राजकारणात शिंदेशाही भक्कम केली आहे.आता तर त्यांना राष्ट्रीय कार्यकारणीत देखील संधी मिळाली आहे.

त्याचबरोबर माढा तालुक्यात भगीरथ म्हणून प्रसिद्ध झालेले आणि सहा वेळा आमदारकी मिळवणारे बबनदादा शिंदे त्याचबरोबर याच घराण्यातील त्यांचे बंधू संजयमामा शिंदे यांनी देखील करमाळ्याच्या राजकारणात आमदारकी मिळवली आहे. आ. बबनदादा शिंदे यांचे चिरंजीव रणजितसिंह शिंदेही राजकारणात आले आहे.आगामी काळात माढ्यातून त्यांना आमदारकीची संधी आहे. अशा पद्धतीने जिल्ह्यात शिंदे आडनावाचे राजकारणातील स्थान अत्यंत भक्कम स्वरूपाचे आहे. त्यामध्ये आता शिंदेच आडनावाचे नवे उमदे नेतृत्व राजकीय पटलावर स्वत:चे अस्तित्व निर्माण करण्यासाठी एन्ट्री करू पाहत आहे. ते म्हणजे दत्ता शिंदे होय. गोकुळ शुगरच्या माध्यमातून अडचणीतील कारखान्याला पुनर्वैभव निर्माण करून दत्ता शिंदे, कपिल शिंदे आणि विशाल शिंदे या त्रिमूर्ती बंधूंनी हा कारखाना यशस्वीरित्या चालून आपल्या नियोजनाची आणि कार्यशैलीची चुणूक दाखवून दिली आहे.

केवळ धोत्रीचा कारखाना आणि परिसराचा विचार न करता बंद पडलेल्या तुळजाभवानी कारखान्याकडे देखील त्यांनी लक्ष देऊन गोकूळ शुगरच युनिट नं.२ सुरू केले आहे. गोकूळ शुगरच्या माध्यमातून त्यांनी अनेक नेत्यांशी संपर्क वाढवला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार, कामगारमंत्री हसन मुश्रीफ, माजी मंत्री सतेज पाटील मधुकरराव चव्हाण, आ. संजयमामा शिंदे, युवा नेते सुनील चव्हाण यांच्या पाठबळातून कारखाना सुस्थितीत आणला आहे.

कारखान्याच्या या यशानंतर त्यांना आता राजकारण येण्याचे वेध लागले आहेत. परंतु कोणत्या दरवाजाने आणि कशा पद्धतीने एन्ट्री करायची यासाठी ते गॉडफादरच्या माध्यमातून चाचपणी करत आहेत.

CMYK